पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 23/12/2019 (सोमवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावर सरकारी दवाखान्या समोर रामटेक येथे दिनांक 22/12/2019 चे 16.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन सीजी–15/ए– 7417 क्रमांकाच्या ट्रकला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 26 जनावरे (बैल) कि. 2,20,000/–रू. ही निर्दयतेने वाहतुक करतांना मिळून आले. त्यापैकी 4 जनावरे मृत अवस्थेत आढळून आले. आरोपी नामे– क्र. 1) सादीक बलदार खान, वय 40 वर्ष, रा. बेलेनगर, कळमना रोड ताजनुरी मज्जीत जवळ, कामठी व 2) शेख नौशाद शेख नबी कुरेशी, वय 35 वर्ष, रा. मोमीनपुरा नागपुर यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 9,20,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई गोविंदराव खांडेकर, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(अ)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 83,130,177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. अतुल कावळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर